म.ग्रं.सं. ठाणे
विषय :
सं. क्र. : 2६८



# चंद्रपूरची महाकाली

६

कृतिका

REFBK-0011402

मराठवाडा-विदर्भ परिसर



सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन

सन १९६०

# चंद्रपूरची महाकाली

जय कमलोद्भवकन्यके, जगदंबिके
वचन आइके जगत्रय-जननी तूं
सुस्वर वरदायिनी, हंसवाहिनी
बुद्धिदायिनी, पुरबी लडिवाळ तूं कृपा
करुनी मम स्फुरवि पराधिक वाणी

— कवि गोविंद
( वणिकर )

२६८
२५३०८
२८८
22/11/60

वि. वा. जोशी

किंमत
६५
नये पैसे

REFBK-0011402
११४०२

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

# विदर्भाचें संस्कृति-वैभव

श्री : २४८

© १९६०

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रा. लि. मुंबई २.

*

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शनमाला : ३१
...विदर्भ परिसर

*

आवृत्ति पहिली : १९६०

*

किंमत ६५ नये पैसे

*

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं, भावरम्य बोलकीं शब्दचित्रें

*

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २.

*

मुद्रक :
ज. ग. जोशी,
जनार्दन प्रेस,
३९४ सदाशिव, पुणें २.

महाराष्ट्राच्या घटकप्रदेशांतील विदर्भ-भूमि अत्यंत प्राचीन आहे. उपनिषत्कालापासून विदर्भाचे गौरवोल्लेख आढळतात. नर्मदा आणि कृष्णा या नद्यांच्या मधल्या प्रदेशांत विदर्भानें प्राचीन काळीं आपला सांस्कृतिक प्रभाव पाडला होता. महर्षि अगस्त्यांच्या तपस्तेजानें उजळून निघालेली लोपामुद्रा, भगवान् श्रीकृष्णाचें हृदय जिंकणारी रुक्मिणी आणि पुण्यश्लोक नलराजासाठीं वनवास पत्करणारी दमयन्ती या विदर्भभूमीच्याच कन्या.

इतिहास-काळांत सातवाहन, वाकाटक, कलचुरी, चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव या सर्व प्रसिद्ध राजकुलांनीं विदर्भाची गौरवशाली परंपरा वर्धिष्णु बनविली. वाकाटकांच्या काळांत तर विदर्भभूमि संस्कृति-वैभवाच्या अत्युच्च शिखरावर होती. गुप्तवाकाटकांनीं भारतीय इतिहासाचें सुवर्णयुग घडविलें—त्या वाकाटकांची राजधानी विदर्भांत नंदिवर्धन (नगरधन) येथें होती. राज्यकर्तृत्व, धर्म, साहित्य आणि कला या संस्कृतीच्या सव अंगाचें विदर्भानें पोषण केलें आहे.

'वैदर्भी रीति' विदर्भाच्या मातींतूनच फुललेली आहे. महाकवि भवभूति हा विदर्भाचाच पुत्र. महानुभावपंथसंस्थापक चक्रधरांचे गुरु गुंडम राऊळ, आदिकवि मुकुंदराज, द्वितीय दत्तावतार श्रीनरसिंह सरस्वती हे मूळचे विदर्भांतीलच.

—श्रीरामाच्या पाऊलखुणा उरीं सांठविणारें रामटेक, रुक्मिणी-स्वयंवराच्या मधुर स्मृतींत रंगणारी अमरावती, जैनांच्या परंपरेची जपणूक करणारा मुक्तागिरि, महाकालीची उपासना करणारें चंद्रपूर, श्रीगणेशाच्या आराधनेंत मग्न असणारीं आधाशा आणि कळंब हीं स्थानें, विदर्भपंढरी कौंडिण्यपूर आणि आधुनिक सन्त श्रीगजाननमहाराज यांचें शेगांव या विदर्भांतील कांहीं संस्कृतिकेंद्रांचा परिचय या मालेंतून करून दिला जात आहे.

२७३४८ ग्रं. प्रकाश
२५६ २२।११।८०
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ११८०२

# चंद्रपूरची महाकाली

## चंद्रपूर

जय अंबे :

चंद्रपूरची श्रीमन्महाकाली देवी ही गोंडवनाची आराध्य-देवता. पुरातन आणि जागृत दैवत, अनेकांच्या नवसास पावणारी, पावत आलेली. भूगर्भात वास्तव्य आणि तिथेंच स्थापना. कृतयुगापासून परंपरेनें कीर्ति पावलेली. अशा ह्या महाकाली देवीला माझे भक्तिभावपूर्वक सहस्त्र प्रणाम असोत.

**अष्टा दंडभुजा प्रचंड सरळा विक्राळ दाढा शुळा**
**रक्तश्री बुबुळा प्रताप अगळा ब्रह्मांडमाळा गळां ।**
**जिव्हा ऊरुस्थळा रुळे लळलळां कल्पांतकालातके**
**साष्टांगें प्रणिपात मी करितसें जयजय महाकालिके ॥**

## पूर्वेतिहास :

कृतयुगांत आजच्या चांदा (चंद्रपूर) या शहराचें नांव 'लोकपूर' असें होतें व हें शहर त्यावेळीं विस्तारानें फार मोठें होतें. कृतध्वज नांवाच्या राजानें हें नगर वसविलें. त्याच्यानंतर त्याचा पुत्र सुनंद गादीवर बसला. ही महाकाली देवी प्रथम त्याच्या स्वप्नांत जाऊन नंतर स्वयंभू रीतीनें प्रकट झाली. तिला भूतनाथ नांवाचा सुंदर पुत्र होता. तो जेव्हां मोठा झाला तेव्हां तो अधिकच सुंदर दिसावयाला लागला व देवस्त्रियांना मोहिनी घालून भुरळ पाडण्याचा प्रयत्न करूं लागला. जेव्हां त्याच्या प्रणयलीला पराकोटीला गेल्या व त्याचा तो भ्रष्टाचार डोळ्यानें पाहवेना तेव्हां महाकाली देवी क्रोधानें अत्यंत संतप्त झाली. तिनें स्वतःच्या हातानें आपल्या पुत्राचें शिरकाण करून त्याला समाधि दिली आणि त्या स्थळीं गाईच्या खुराच्या आकाराची मोहर बसविली. ती इतकी अचल होती कीं त्यावरूनच त्या स्थळाला 'अचलेश्वर' नांव पडलें.

पुढें द्वापरयुगांत कुणा चंद्रहास्य राजानें आपल्या कौतलपूर राजधानीचा कांहीं अंतस्थ व अंतर्गत कारणांमुळें त्याग केला. (हें कौतलपूर म्हणजे सध्यांचें नागपूर जिल्ह्यांतील काटोल किंवा यवतमाळ जिल्ह्यांतील केळापूर असावें असा इतिहास संशोधकांचा कयास आहे.) हा राजा अरण्यांत भटकत असतां त्याला प्रस्तुत महाकालीचें व अचलेश्वराचें स्थलदर्शन घडलें. हें स्थान पसंत पडल्यामुळें त्यानें त्याच्या परिसरांतच राजधानी वसविली. आपल्या नांवावरून त्यानें लोकपूरचें संस्कृतांत 'इंदुपूर' व मराठींत 'चंद्रपूर' नांव ठेवलें.

## ऐतिहासिक काल :

पौराणिक काळानंतर प्रस्तुत महाकालीच्या या क्षेत्राला ऐतिहासिक काळांत गोंड राजांच्या वेळेपासून महत्त्व प्राप्त

झालें; तें आजतागायत कायम आहे. चंद्रपूरपासून अकरा मैलांवर असलेल्या बल्लारपूरचा तत्कालीन बादशहा खांडक्या बल्लाळ हा लहानपणापासून नेहमीं रोगी असायचा. पुढें पुढें त्याच्या सर्वांगाला कुष्ठ-रोगासारखीं खांडकें पडलीं. यावरून त्याला सर्व लोक 'खांडक्या' म्हणूनच संबोधूं लागले. बल्लाळशहा हें त्याचें परंपरागत चालत आलेलें आडनांव; त्यावरून खांड-क्याच्या पूर्वजांनीं बांधलेलें गांव 'बल्लारशहा' किंवा 'बल्लारपूर' या नांवानें ओळखलें जाऊं लागलें.


चंद्रपूरची महाकाली

खांडक्या बल्लाळशहाची राणी अत्यंत चतुर, सुलक्षणी, भक्तिपरायण व सुंदर होती. तिनें आपल्या नवऱ्याची प्रकृती सुधारण्यासाठीं पुष्कळ प्रयत्न केले. बल्लारपुराहून सहा मैलांवर असलेलें वनश्रीनें व तलावानें नटलेलें निसर्गरम्य स्थळ ( जुनोना ) तिनें पसंत केलें; व हवापालट करण्याकरितां निवासस्थान असावें म्हणून तेथें एक सुंदर महाल बांधला. वर्षांतून कित्येक महिने त्यांचें तेथें वास्तव्य असे. राजाला मोकळ्या हवेंत फिरावयास मिळावें व स्वच्छंदानें अरण्यांत विहार करतां यावा म्हणून तिनें त्याला शिकारीचा नादहि लावला.

असाच एके दिवशीं राजा खांडक्या बल्लाळशहा शिकारीसाठीं अरण्यांत शिरला. पुष्कळ प्रयत्न करून व बरेंच रान पालथें घालूनहि त्याला शिकार कांहीं मिळाली नाहीं. उन्हाळ्याचे ते दिवस होते. त्यांत वैशाख महिना. आधींच

उन्ह रखरखलेलें; त्यांतच तो फिरून फिरून दमलेला. त्याला अत्यंत तहान लागली. तहानेनें तो फारच व्याकूळ झाला व पाण्याच्या शोधार्थ इकडे तिकडे हिंडूं लागला. पौराणिक काळांत वैभव प्राप्त झालेलें इंदुपूर (चंद्रपूर) नगर यावेळीं उध्वस्त झालेलें होतें. त्या ठिकाणीं वस्ती मुळींच नव्हती. सभों-वार कुठें घनदाट तर कुठें विरल असें अरण्य वाढलेलें होतें.

**अद्भुत कुंड :**

जातां जातां राजा खांडक्या या उध्वस्त शहराला लागून असलेल्या झरपट नदीच्या तीरावर आला व नदीच्या पात्रांत पाण्यासाठीं त्यानें शोधाशोध चालविली. अगोदरच उन्हाळ्याचे दिवस. त्यांत वैशाखाचा महिना; नदीचें पात्र उथळ, तेव्हां इकडे तिकडे चौफेर फिरूनहि त्याला पाण्याचा एकहि थेंब मिळाला नाहीं. थकून तो नदीकांठावरील एका ओबडधोबड दगडावर बसला. त्याचें लक्ष त्या दगडाजवळील एका खबदाडाकडे गेलें. तेथें काय आहे हें त्यानें मोठ्या औत्सुक्यानें पाहिलें तों तेथें एक 'कुंड' असून त्यांत पाणी असलेलें त्याच्या नजरेस पडलें. तो तहानेनें अत्यंत व्याकूळ झाला होता. तें पाणी किती दिवसांचें सांचलेलें व गढूळ होतें याकडे त्याचें मुळींच लक्ष नव्हतें. त्यानें त्या कुंडांतील पाण्याच्या ओंजळीमागें ओंजळी घशाखालीं रिचवून आपली तृषा शांत केली; व तोंड धुवून थोडी विश्रांति घेतली. परततांना त्याला एक सुंदरशी शिकार सांपडली. रात्रीं राजाराणी त्या खाद्यावर यथेच्छ ताव मारून झोंपीं गेलीं. कित्येक दिवसांत त्याला गाढ झोंपहि लागली नव्हती ती त्याला त्या दिवशीं प्रथमच लागली; आणि दुसरे दिवशीं तो अत्यंत ताजातवाना होऊन उठला.

राणीनें त्याच्याकडे पाहिलें तों त्याच्या तोंडावरील बरेच डाग नष्ट झालेले दिसले. नंतर तिचें लक्ष राजाच्या हातांकडे

गेलें. तेथेंहि झालेला फरक तिच्या लक्षांत आला. तिनें राजाजवळ त्याबद्दल चौकशी केली; तेव्हां त्यानें आदल्या दिवशीं घडलेली सर्व हकीकत सांगितली. राणीला वाटलें, राजा ज्या ठिकाणीं आपली तृषा भागविण्यास गेला त्या कुंडांतील पाण्यांत कांहीं विशिष्ट गुण असावा; म्हणूनच तर राजाच्या चेहेऱ्यावर हा फरक दिसत आहे. तिनें लागलीच राजाला तें स्थळ दाखविण्याबद्दल विनंती केली. राजालाहि आपल्या हाताकडे पाहून तो फरक जाणवला. नंतर राजा राणीसह त्या कुंडाकडे जाण्यास निघाला. प्रथम ती जागा लवकर सांपडेना, पण थोडा प्रयत्न केल्यानंतर ती सांपडली. राणीनें तें कुंड स्वच्छ करविलें. तेव्हां तेथील खडकावर तिला गाईचीं पांच खुरें आढळलीं; त्यांत पाणी सांचलें होतें. चमत्कार असा कीं कितीहि पाणी काढलें तरी ती खुरांची जागां पुन्हां पाण्यानें भरून जावयाची. तें पाहून राणीची खात्रीच झाली कीं हें खरोखरीच एखादें पवित्र स्थळ असावें. तिनें नंतर राजाला तेथील उदकानें स्नान घातलें; त्यामुळें त्याच्या अंगावरील तीं खांडकें (फोड) नाहींशीं होऊन सर्व शरीर स्वच्छ, निरोगी व तेजस्वी दिसूं लागलें. राणीला तें पाहून अत्यानंद झाला.

रात्रीं झोपेंत राणीच्या स्वप्नांत महादेव प्रगट झाले. त्यांनीं तिला दृष्टांत दिला कीं, ती गोखुरासारखी पिंडी आहे ती अचल आहे; आहे त्याच ठिकाणीं ती प्रस्थापित करावी. तसेंच तेथून थोड्या अंतरावर दक्षिणेस भुयारांत देवी (पार्वती-महाकाली) असल्याचें सांगून शिव अंतर्धान पावले. राणीनें उजाडतांच उठल्यावर तें स्वप्न राजास सांगितलें. दोघांनाहि अत्यानंद झाला.

राजानें ती पिंडी स्वच्छ करविली व दृष्टांताप्रमाणें दक्षिणेस महाकालीचें भुयार शोधून काढून दोन्ही देवतांची त्या होत्या त्या त्या ठिकाणीं प्रस्थापना केली. त्यावर लहान

देवळें उभारलीं. नंतर राजा-राणी भक्तिभावानें पूजाअर्चा करीत तेथें सुखानें नांदूं लागलीं.

## अद्भुत चमत्कार :

पण त्या अचलेश्वर-महाकालीचा मनोदय कांहीं निराळाच असावा. त्या एकंदर परिसरांत (क्षेत्रांत) थोड्याच दिवसांत कांहीं अद्भुत असा प्रकार घडला; तो पाहून राजा तर चकितच झाला.

एके दिवशीं राजा खांडक्या बल्लाळशा बल्लारपूरवरून महादेवाच्या दर्शनास निघाला असतां एका बिळांतून एक ससा निघाला. राजा जेव्हां जेव्हां शिकारीला किंवा कोठें बाहेर पडत असे त्यावेळीं त्याच्या समवेत अल्पस्वल्प लवाजमा व शिकारी कुत्रा अवश्य रहात असे.

बिळांतून निघालेला ससा सरळ राजासमवेत असलेल्या त्या शिकारी कुत्र्याच्या अंगावर चालून आला आणि आश्चर्य हें कीं एवढा जबरदस्त शिकारी कुत्रा कीं, ज्यानें सहज लीलेनें कित्येक सांबरांना, चित्त्यांना चार दोन घावांत पकडून लोळवून राजाला शिकार साधून द्यायची, पण आतां उलट तोच भीतीनें पळूं लागला होता! अर्थात् हा प्रकार अगदीं वैचित्र्यपूर्ण व उलटा होता. तें पाहून राजाचें आश्चर्य पराकोटीला गेलें आणि तो आपल्या घोड्यावरून त्या दोघांपाठोपाठ जाऊं लागला. राजाचा शिकारी कुत्रा वर्तुळाकार फिरे तर ससा अधूनमधून आडवळणें घेई व मध्यें पडलेलें अंतर तोडून त्याला गांठण्याचा प्रयत्न करी. असें बराच वेळ चाललें; पण हा पाठ-शिवणीचा खेळ पूर्वस्थळीं येतांच संपला; आणि त्या शिकारी कुत्र्यानें त्या सशावर झडप घालून त्याला ठार केलें.

राजालाच नव्हे तर त्याच्याबरोबर असलेल्या एकदोन शिपायांनाहि तो प्रकार अत्यंत आश्चर्यजनक वाटला; पण

त्याची कोणीच मनाला पटेल अशी उकल करूं शकला नांहीं. शेवटीं राजानें आपल्या मंत्रितुल्य राणीचा याबाबत सल्ला घेतला. तिला पण हें एक अद्‌भुत असें नवल वाटलें. नंतर दोघांनीं मिळून त्या जागेची व सभोंवतील एकंदर परिक्षेत्राची पहाणी केली. अखेर राणीनें तिथें किल्ला बांधण्यास राजाला सूचना दिली. ह्या ठिकाणीं जर आपण तट उभारला तर तो अभेद्य राहील; पण ज्या ठिकाणीं सशाला कुत्र्यानें ठार केलें ती जागा अशुभ व धोक्याची राहील; असें तिनें एकंदर पाहणी करून सांगितलें.

कुत्रा जरी बव्हंशीं वर्तुळाकार फिरत होता, तरी ससा वेडींवांकडीं वळणें घेत त्या कुत्र्याचा पाठलाग करीत होता. राजानें सशाच्या मार्गाचा आपल्या पदरीं असलेल्या तेलठाकूर नांवाच्या एका रजपूत वास्तुशास्त्रज्ञाकरवीं नकाशा काढून घेऊन



पठाणपुरा गेट : चांदा
याच किल्ल्यानें इंग्रजांशीं सतत
सात दिवस यशस्वी झुंज दिली होती.

तेथें किल्ला उभारण्यास आज्ञा केली. नकाशा अगदीं तंतोतंत व सशाच्या वाटचालीनें काढण्यास त्यामागून येणाऱ्या राजाच्या घोडयांच्या टापांचा फार उपयोग झाला. आणि आजहि बराच सुस्थितींत असलेला ह्या इतिहासप्रसिद्ध चंद्रपूर नगरीचा तट बव्हंशीं बऱ्याच ठिकाणीं वांकडीं तिकडीं वळणें घेत बांधला गेलेला दृष्टोत्पत्तीस येईल. इतकेंच नव्हे तर त्या शिकारी कुत्र्यानें त्या सशाला गारद केलें ती अशुभ बाजू पुढें गोंड राजांच्या अस्तमानकाळीं इंग्रजांनीं पराकाष्ठेचा प्रयत्न करून व प्रवेश मिळवून यथार्थानें अशुभ ठरवून दाखविली. आजहि तें खिडार त्या वैचित्र्यपूर्ण प्रसंगाची साक्ष देत आहे.

या किल्ल्याला भव्य असे चार दरवाजे (म्हाद्वारें) असून त्यांना प्रत्येकीं जटपुरा, बिनबा, पठाणपुरा व अचलेश्वर (अचलेश्वर-मंदिराजवळ म्हणून) हीं नांवें आहेत. या महाद्वारांखेरीज या तटाला आग्नेय, नैर्ऋत्य व वायव्य या तीन उपदिशांस व ईशान्येस दोन अशा पांच खिडक्याहि आहेत.

**महाकालीची यात्रा :**

अचलेश्वर दरवाजाच्या लगतच थोड्या अंतरावर झरपट नदीच्या दोन्ही कांठांवर अचलेश्वर व महाकाली अशीं दोन भव्य मंदिरें पुढें बांधण्यांत आलीं; आणि त्या स्थानाला तीर्थाचें स्वरूप प्राप्त झालें. महाकाली देवी अनेकांच्या नवसास पावूं लागली. जागृत दैवत म्हणून तिचा दूरवर बोलबाला झाला. चैत्र महिन्यांत येथें पूर्ण महिनाभर मोठ्या प्रमाणांत जत्रा भरत असते. आणि नर्मदेपासून गोदावरीपर्यंत आणि नांदेडपासून पूर्वेस राजनांदगांवपर्यंत अनेक दूर दूर प्रांताचे लोक देवीच्या दर्शनास येत असतात.

देवळांत पौर्णिमेच्या दिवशीं मोठा महोत्सव होत असतो. त्या रात्रीं बारा वाजण्याचे सुमारास (मध्यरात्रीं) त्रिपुर

जाळण्यांत येतो. त्यावेळीं जत्रेला एखाद्या महापुराचें स्वरूप येत असतें. अगोदरच्या यात्रिकांत स्थानिक आणि चंद्रपुराच्या परिसरांतील अनेक खेड्यापाड्यांतून येणाऱ्या लोकांची भरती होते. स्त्रीपुरुषांची या आठवड्यांत महाकालीची पूजा बांधण्यांत मोठी अहमहमिका चालू असते. आणि तिला हळदीकुंकू वाहण्यासाठीं स्त्रियांची विलक्षण गर्दी उसळते.

नांदेड विभागांतील लोकांची या महाकाली देवीवर विशेष श्रद्धा आहे. दरवर्षी जत्रेंत तिकडील भाविक लोक मोठ्या संख्येनें येऊन आपापले नवस फेडतात. त्यासंबंधींची पूर्वपीठिका अशी आहे :

पूर्वीच्या निजाम राज्यांत नांदेड जिल्ह्यांत तळेगांव-उमरी येथें वास्तव्य करणारी राजाबाई देवकरीण ही आदिशक्तीची उपासक होती. तिला देवीनें दृष्टांत दिला कीं, 'मी चंद्रपूर–गड–परगण्यांत आहे. तिथें तूं जा आणि भक्ति कर'. राजाबाईला त्यामुळें अपरिमित आनंद झाला; व ती बरेच भक्तगण जमवून चंद्रपुरास आली. तिनें महाकालीचें दर्शन घेऊन भक्तिभावानें पूजा-अर्चा केली; व दृष्टांताप्रमाणें तिला देवीनें दर्शन दिलें. तिनें गांवोगांव फिरून निजाम राज्यांत व वऱ्हाडांत महाकाली देवीचा व तिच्या भक्तीचा अत्यंत श्रद्धापूर्वक प्रचार केला. तेव्हांपासून नांदेड, परभणी, बिदर आणि विदर्भांतील यवतमाळ जिल्ह्यांतील मराठे, कैकाडी, वंजारी आदि जातीचे सुमारें चारपांच हजार लोक दरवर्षी यात्रेला येत असतात. ते चैत्र पौर्णिमेला देवीला अहेर अर्पण करतात. श्रीमंत लोक देवालयाच्या व्यवस्थेकरितां मोठमोठ्या रकमा देतात. कित्येक भक्तगण बकरे, म्हशी जिवंत सोडतात तर कांहीं बकरे आणि कोंबडे बळी देतात. देवळासमोर अशामुळें घाण होऊं नये म्हणून देवळामागें देवीच्या पदकमलांची स्थापना केली आहे; तिथें हा बलिदानाचा कार्यक्रम पार पाडण्यांत येतो.

**भक्तगण पोतराजे व देवकरणी :**

दूरवरच्या तीर्थस्थानाला (यात्रेला) जावयाचें म्हणजे भक्तगण दिंड्या पताकांसह मेळाव्यानें जात असतात. देहू, आळंदी, पंढरपूर आदि स्थळें ज्यांनीं पाहिलीं त्यांना हा अनुभव आहे. तसेंच इकडे महादेवाला (छिंदवाडा जिल्ह्यांतील डोंगर-देव पहाडावर) जातांना भक्तगण अशींच मेळाव्यानें महादेव–पार्वतीचीं गाणीं म्हणत जात असतात. महाकाली देवीच्या दर्शनास विशेषत: नांदेड-वऱ्हाडांतून येणारी भक्तमंडळी इकडे येतांना मार्गानें अशा प्रकारचीं देवीच्या स्तुतीपर गाणीं म्हणत येतात. त्या अनेक गाण्यांपैकीं येथें एक देत आहें.

**वर्धेहून दिसे गड चांद्याची चांदणी । गोंडराजाची बांधणी**
**वर्धेहून दिसे गड चांदियाचा आंबा । राहुळांत माझी रंभा**
**वर्धेहून दिसे गड चांदियाचे लिंब । राहुळाला सोळा खांब**
**वर्धेहून दिसे गड चांदियाची चिंच । सव्वाहात गादी उंच**
**वर्धेहून दिसे गड चांद्याचा कळस । शिखरी सोन्याचा कळस**
**वर्धेहून दिसे गड चांद्याचा फत्तर । खांबाखांबाला अत्तर ॥ १ ॥**

प्रस्तुत गीत नांदेड जिल्ह्यांतील एक देवीभक्तिपरायण कै. यमुनाबाई भोई देवकरीण रा० शिंदी - सेलगांव हिनें तयार केलेलें आहे. तिला ‘ जमनाबाई ’ नांवानेंहि ओळखीत असत. व दर वर्षी तिथून येणाऱ्या भक्तगणांचा मेळावा “ जमनाबाईचा पोहा ” (मेळा-जथ्था) म्हणून संबोधिला जातो.

अशा कांहीं मेळ्यांचे प्रमुख गायकांना जर तो पुरुष असेल तर ‘ पोतराजे ’ म्हणतात आणि स्त्री असेल तर ‘ देवकरणी ’ म्हणण्याची प्रथा आहे. ते येथें येऊन भक्तिभावानें महाकालीची पूजा-अर्चा करतात. ती संपल्यानंतर तिच्यापुढें घोळ घालून (गोंधळाप्रमाणें) नृत्य करीत तिच्या सांत्वनपर गाणीं म्हणतात. हे पोतराजे ‘ साठधारी ’ असतात. उघडें अंग, डोक्यावर केसांचा

संभार, कपाळाला मळवट फांसलेला, गळ्यांत लांबच लांब साठा (आसूड), कमरेला झगा व डाव्या हातांतील अंगठ्यांत नृत्याच्या वेळीं वाजविण्याची खुळखुळी असा त्यांचा एकंदर वेष असतो. देवीच्या देवळासमोर जें यज्ञकुंड आहे त्यांत त्या दिवसांत अहोरात्र अग्नि पेटलेला असतो; व सभोंवार भक्तगणांचा मेळा विशिष्ट वाद्यांची (डफ-डफरें) साथ देत असतो. ही साथ घेत पोतराजे गाऊं लागतात :

माय माझी महाकाली तूं सत्त्वाची ग धार ।
साऱ्या घाटाची मालकीण दया करी आम्हांवर ॥ ध्रु० ॥
आई माझी महाकाली मूळ शक्तीचा अवतार ।
दैत्य मारुनि केले ठार हातीं शोभती शीर ।
हातीं नंगी तरवार दैत्य शीरांचा बांधला पाळ ।
माय बसे पाळावर चाल केली पृथ्वीवर ॥
सव्वा घटकेच्या बोलीनं चालून आली चंद्रपूर ।
मायेनं दिलं कडासन जागा शीतल भुयार ॥
सूर्यापाठीं समोर हातीं शोभे त्रिशूळ ।
गळां झळके चंद्रहार मुखीं सूर्याचं तेजाळ ॥
देवीचा पडला प्रकाश तिचा नवखंडीं धाक ।
कांपे चळचळां दैत्य दुष्ट असूर आणिक ॥
माय माझी महाकाली तूं सत्त्वाची ग धार ।
साऱ्या घाटाची मालकीण दया करी आम्हांवर ॥ १ ॥

झाली गोंड राजाला प्रसन्न सत्ययुगाची खूण ।
देवी माझ्या महाकालीनं दाखविलं त्याला धन ।
मायेच्या राहुळाची पुढं केली बांधवळ ।
बारा दरवाजाचं वाड पांचा कळसाचं राहूळ ॥
दारीं पेटे दीपमाळ माता अग्नीचा लोळ ।
देवी माझ्या महाकालीचा खबरदार हाय खेळ ॥

गोंड राजाला प्रसन्न ध्वज मोत्याचा लाऊन ।
चंद्रपुरीं दिधलं ठाण मायेचं भूयारीं राहणं ॥
अवघ्या चांदियाला वेढा बयाचा किल्ला कोस बारा ।
गोंड राजानं बांधला जवळी महाकालीचा डेरा ॥
माय माझी महाकाली तूं सत्त्वाची ग धार ।
साऱ्या घाटाची मालकीण दया करी आम्हांवर ॥ २ ॥

माता संकटाचे वेळीं साता विघ्नाची मालकीण ।
हातीं दैत्याचें शीर खेळणं तिचं शीलांगण ॥
ऐन चैत्राच्या महिन्यांत तुझा चाले जयजयकार ।
पायीं पोलारांचा नाद गरतीचे जोडवे चार ॥
आई माझ्या महाकालीची थंड्या पाण्याची अंघोळ ।
पिवळा पितांबर नेसे मायेला शोभे पायघोळ ॥
कमरेला कमरपट्टा मायेचा तेलंगी हो थाट ।
वाई गोंडाच्या रानांत जवळी नद झरपट ॥
चंद्रपूरीं दिलं ठाण भूयारांत दिलं ठाण ।
गोंड राजाला प्रसन्न ध्वज मोत्याचा लाऊन ॥
माय माझी महाकाली तूं सत्त्वाची ग धार ।
साऱ्या घाटाची मालकीण दया करी आम्हांवर ॥ ३ ॥

पोतराजांच्या किंवा देवकरणींच्या गाण्यांना साथ देणारीं वाद्येंहि विशिष्ट तऱ्हेचीं असतात; आणि त्यांतून निघणारा ध्वनि कर्णमधुर असतो. निरनिराळ्या लयांमधून स्वर जसजसा उंचावत जातो तसतसा त्यांच्या अंगांत जोष येतो आणि त्या आनंदानें ते अगदीं बेहोष होऊन जातात. तें दृश्य पाहून त्यांचे साथीदार व इतर भक्तगण त्यांचें अनुकरण करूं लागतात. आणि सभोंवारचा अफाट प्रेक्षकवर्ग कितीतरी वेळ आसमंताचें भान विसरून तन्मयतेनें तें दृश्य पहात उभा रहातो. देवळांवर त्या प्रसंगीं केलेली आरास—अगदीं कळसापर्यंत केलेली आरास

खरोखरीच अत्यंत मनोहर व विलोभनीय दिसते. देवळां-सभोंवतीं पसरलेला तो अफाट जनसंमर्द व जमलेली जत्रा पाहून बहुजनसमाजाला अपरिमित आनंद होतो.

पोतराजे एकदां अशा बेहोष आनंदांत रममाण झाले कीं ते हातांतील साठ (आसूड) आपल्या अंगावर सपासप ओढून घेतात व असें केल्यानें आपण करीत असलेली भक्ति व अर्पण केलेला अहेर महाकालीला पावतो अशी त्यांची समजूत आहे. नंतर आरती होते.

## आ र ती

**आरती धूर्पताची अंबाबाई रेणुकेची ॥ धृ० ॥**
**मेळे आले जोगीणींचे । चरण वंदा आंबिकेचे ।**
**मायच्या पायऱ्या ओल्या झाल्या । दासी तिच्या पाण्या गेल्या ॥**
**तुझ्या भांडाराचं लेणं । शक्ति झाली प्रसन्न ।**
**पांच लाऊनियां ज्योति । ओवाळा मायेची मूर्ती ॥**
**कापूर लावूनियां ज्योति । ओवाळा आधीं मायाशक्ति ॥**
**लगबग धांव कशी । आपुल्या भक्ता पाहे पाशी ॥**
**आरती धूर्पताची । अंबाबाई रेणुकेची ॥**

## 'मालती-माधव' नाटकाशीं संबंध :

चंद्रपूर शहराजवळ उत्तरेस 'पद्मपूर' नांवाचें गांव आहे. भवभूतीचें जन्मस्थान जें पद्मपूर तें हेंच किंवा दुसरें याबद्दल अजूनहि इतिहासज्ञांत व पुराणवस्तु संशोधकांत वाद आहे. कांहींच्या मतें हेंच तें पद्मपूर असावें तर म. म. प्रा. वा. वि. मिराशी यांनीं भंडारा जिल्ह्यांतील आमगांव स्टेशनच्या पूर्वेस अडीच मैलांवर पद्मपूर नांवाचें जें गांव आहे तें भवभूतीचें जन्मस्थान असावें असें अनुमान काढलें आहे.

'मालती-माधव' नाटकांतील वर्णन आणि एकंदर वातावरणावरून पद्मावतीचें जें वर्णन आलें आहे त्यांत उल्लेखिलेल्या पारा, सिंधु, मधुमती आणि लवणा नद्यांचें, मधुमती व सिंधु यांच्या संगमावरच्या सुवर्णबिंदु नामक शिवालयाचें व त्याच्या परिसरांतील देवीच्या देवळाचें जें वर्णन 'मालती-माधवां'त आलें आहे तें ग्वाल्हेरपासून नैर्ऋत्येस ४०-४५ मैलांवर असलेल्या पद्मवाया खेड्याला लागू पडेल. कारण त्या दोन नद्यांच्या संगमावर सोनबिंदु नामक शिवालय आजहि भग्न स्थितींत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. त्याच्या परिसरांत देवीचें देऊळहि आहे. तेव्हां पद्मपूरजवळ (चंद्रपूरला) असलेल्या (महाकाली) देवीजवळ मालतीला बळी देण्यास नेलें कीं उपरोक्त 'पद्मवाया' खेड्यांतील देवीच्या देवळांत, याबद्दल इतिहास संशोधकांत वाद आहे. तथापि भवभूतीचें जन्मस्थान सध्यां तरी वर दिलेल्या भंडाऱ्याजवळील आमगांव स्टेशननजीकचें 'पद्मपूर' हें निश्चित झालेलें आहे.

## दंतकथा :

अशा तीर्थक्षेत्रांसंबंधीं जसे अनेक लोकप्रवाद असतात तशा कांहीं दंतकथाहि असतात. प्रस्तुत महाकालीच्या पौराणिक आणि ऐतिहासिक वर्णनाबरोबरच बहुजनसमाजाच्या जिव्हेवर एक दंतकथाहि घोळत असल्याचें प्रत्ययास आलें. त्याला कालमानाचा पुरावा नाहीं; पण पूर्वीं हें चंद्रपूर गांव जेव्हां अगदींच खेडें होतें व महाकाली देवीचें सध्यांचें देऊळ ज्या जंगलांत होतें तेथें कोणी मेंढपाळ आपल्या बकऱ्या-मेंढ्या चारावयास नेत असे. कित्येक वर्षें त्याचा हा दिनक्रम चालू होता. गोठ्यांतून सकाळीं बकऱ्या-मेंढ्या जंगलांत न्यावयाच्या, तेथें चारावयाच्या, त्यांना झरपट नदीचें पाणी पाजावयाचें आणि परत सर्वांना घेऊन घरीं यावयाचें, असा त्याचा क्रम. पण एके दिवशीं त्याच्या लक्षांत आलें कीं, त्याच्या चार खंड्या

बकऱ्या-मेंढ्यापैकीं अवघ्या तीन खंड्या बकऱ्या-मेंढ्या शिल्लक राहिल्या आहेत. रानांत वाघरु वगैरे तर फिरकत नाहीं अशी त्याला शंका आली व तो जागरुकतेनें राहून पाहूं लागला; पण कोठेंहि त्याला हिंस्त्र श्वापद किंवा अन्य कांहींहि धोका आढळला नाहीं. मात्र त्याची एकेक बकरी रोज कमी होण्याचा क्रम कांहीं बंद पडला नाहीं. त्याला मोठें आश्चर्य वाटलें व दररोज होणाऱ्या ह्या हानीमुळें तो घाबरला. गांवालगत जंगल म्हटलें तर त्याच बाजूनें होतें. बाकी विरळ झुडुपी रान व सभोंवार मैदान पसरलेलें. दुसरीकडे त्यांना चारा नव्हता.

पूर्वीच्या लोकांत, आणि आतांसुद्धां, कित्येकांची माराई, म्हसोबा, खंडोबा आदि देवदेवतांविषयीं श्रद्धा असे. त्यानें देवीला नवस केला कीं, " उद्यांपासून माझ्या कळपांतील बकरीं कमी होणार नाहींत तर मी तुझी समारंभानें पूजा बांधीन व एक बकरा बळी देईन. " आणि आश्चर्य हें कीं त्याच रात्रीं ही भुयारांतील देवी (महाकाली) त्याच्या स्वप्नांत गेली व सांगूं लागली कीं, " मी स्वयंभू महाकाली देवी असून जागृत दैवत आहें. मी आहें त्या ठिकाणीं तूं माझी स्थापना कर आणि माझी पूजा बांध म्हणजे तुझें संकट निवारण होईल. "

दुसरे दिवशीं गुराखी जागा झाला तेव्हां त्याला देवीनें दिलेला दृष्टान्त आठवला. रात्रीं तो आपला बकऱ्या-मेंढ्यांचा कळप घेऊन दररोजप्रमाणें त्या जंगलांत गेला व अनुमानानें दृष्टान्तांत पाहिल्याप्रमाणें देवीचें भुयार शोधूं लागला. बराच वेळ शोध करून तो थकला व एका शिळेवर येऊन बसला. जवळच कोठून तरी त्याला आवाज ऐकूं आला, " मी इथें आहें; मी इथें आहें. " ते शब्द ऐकून त्याला आश्चर्य वाटलें. थोडी भीति पण वाटली. पण मोठी हिंमत करून त्यानें तो आवाज येणाऱ्या दिशेकडे पाऊल वळविलें. पंचवीस पावलें टाकतो न टाकतो, तोंच त्याला तें भुयार दिसलें आणि अपरिमित आनंद झाला

त्यानें त्या भुयारांत डोकावून पाहिलें, तों तिथें एक अति कृष्ण-वर्णीय मूर्ति त्याला दिसली. ती मूर्ति व्यवस्थितपणें वर काढा-वयास कांहीं साधन त्यावेळीं त्याच्यापाशीं नव्हतें. आतां आपल्याजवळ पहार असती तर फार बरें झालें असतें, असा विचार मनांत येतांच तो तांतडीनें बकऱ्या-मेंढ्यांचा कळप तसाच तेथें सोडून गांवांत आला. प्रथम कोतवालाला व नंतर त्या गांवच्या पाटलाला त्यानें वर्दी दिली. त्या सर्वांनीं कुदळ-पावडीं वगैरे घेऊन परत त्या भुयाराकडे प्रयाण केलें; व अगदीं काळजीपूर्वक ती मूर्ति बाहेर काढली. तेथें एक छोटासा चबुतरा तयार करून त्यावर त्यांनीं ती बसविली. मूर्ति अतिशय काळी कुळकुळीत होती. प्रथम ती गुराख्याच्या दृष्टीस पडतांच त्याच्या तोंडून 'महाकारी' असें शब्द निघाले; व त्यावरून पुढें तिला सर्वजण 'महाकाली' म्हणूं लागले.

**महाकाली-मंदिराची स्थापना :**


गोंड राजांच्या वंशावळींत ज्याप्रमाणें कांहीं शूरवीर लढवय्ये गोंड राजे होऊन गेले त्याचप्रमाणें कांहीं स्त्रिया पण निर्माण झाल्या. अशा अनेक स्त्रियांत राजा वीरशहा याची पत्नी राणी हिराई हिचा उल्लेख करावा लागेल. ती 'चंद्रपूरची अहिल्याबाई होळकर' म्हणून गाजली.

वीरशहाला पुत्र नव्हता; एकुलती एक मुलगी होती. ती देवगडचा राजा दुर्गपाल याला दिली होती. तिचा एकदां दुर्गपालानें उपमर्द केला. ती मुलगी मोठी बाणेदार होती. ती माहेरीं परत आली व तिनें आपल्या आईला—राणी हिराईला सर्व कांहीं कथन केले. तें ऐकून राणी अत्यंत क्रोधाविष्ट झाली व आपल्या मुलीच्या अपमानाचा सूड घेण्यास तिनें राजाला उद्युक्त केलें. राजालाहि तो प्रकार ऐकून अत्यंत चीड आली व तो दुर्गपालावर चालून गेला. पोटच्या पोरीच्या सौभाग्यापेक्षां

आपल्या राजघराण्याच्या झालेल्या उपमर्दाचा सूड त्याला अधिक महत्त्वाचा वाटला. लढाईवर निघण्यापूर्वी त्यानें जोडप्यानें महाकालीचें दर्शन घेतले. राणी हिराईनें तर देवीला सरळ कौलच मागितला कीं, या लढाईत जय मिळाला तर मी दुर्गपालाचें शीर तुझ्या चरणीं वाहीन; आणि त्याप्रमाणें झालेंहि. सुरवातीस दुर्गपालाची सरशी झाली. पण वीरशहा "जय महाकाली "चा त्रिवार घोष करीत मोठ्या धैर्यानें दुर्गपालावर चालून गेला आणि त्यानें त्याचें शीर धडावेगळें केलें. दुर्गपालाची फौज पळून गेली.

हा विजय आपल्यास महाकालीच्या कृपेनें मिळाला म्हणून हिराईनें दुर्गपालाचें शीर मोठा समारंभ करून देवीला वाहिलें. पुढें कालवशांत वीरशहाहि मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर राणी हिराईनें दत्तक घेऊन त्याचें नांव रामशहा ठेवलें; व तो सज्ञान होईपर्यंत तिनें मोठ्या कुशलतेनें राज्यकारभार चालविला. तिची कारकीर्द प्रजेस फारच सुखावह गेली. तिनें आपल्या कारकीर्दींत पुष्कळ दानधर्म केला, अनेक देवळें बांधलीं. त्यांतच तिनें महाकालीचें जुनें देऊळ पाडून सध्यांचें नवीन मंदिर बांधलें. दुर्गपालाचें पारिपत्य करून जो विजय मिळविला त्याची स्मृति कायम रहावी म्हणून दगडाचें एक शीर करून तिनें तें मंदिरावर उत्तराभिमुख बसविलें. चैत्रपौर्णिमेची यात्रा तिच्याच राजवटीपासून सुरू झाली.

देवळाच्या आवारास उत्तर व पूर्व दिशांना ज्या दगडाच्या दोन चबुतरेवजा भिंती आहेत त्या इंग्रज राजवटींत इ. स. १८२४ मध्यें बांधल्या गेल्या. हें महाकालीचें मंदिर परकोटाच्या बाहेर झरपट नदीच्या पलीकडे अचलेश्वर दरवाजापासून सुमारें एक फर्लांगावर आहे. देऊळ औरस चौरस ५४ फूट असून उंची साठ फूट असावी. तें नैर्ऋत्याभिमुख आहे. देवळांत जमिनीच्या सपाटीपासून पांच फूट उंचीची फरसबंदी असून मध्यभागीं ६ फूट खोलीचें व १८ फूट औरस चौरस असें एक तळघर आहे.



महाकालीचें मंदिर : चांदा

तळघरांत खडकांत कोरलेली पांच फूट उंचीची देवीची मूर्ति आहे. तिच्या एका हातांत खड्ग आणि दुसऱ्या हातांत ढाल आहे. देवीस संपूर्ण शिंदूर भरतात. यात्रेच्या वेळीं सकल साज-शृंगार करतात. या तळघरामागें दुसरें एक लहानसें तळघर आहे. त्यांत देवीचा पलंग आहे. गच्चीवर जाण्याकरितां दोन चक्राकार जिने आहेत. देवळाच्या देखरेखीला भोसले सरकारकडून कांहीं नेमणूक लावून देण्यांत आली होती. पुढें इंग्रज सरकारनें एक प्रॉमिसरी नोट लिहून देऊन त्यावरील व्याज देवळाचे खर्चा-करितां देण्याची व्यवस्था केली.

येथवर महाकाली देवीचा पूर्वेतिहास, स्थलनिर्देश व निरनिराळ्या राज्यसत्तेला या दैवतापासून मिळालेले अनुभव, जय, विजय तसेंच बहुजनसमाजाच्या जिव्हेवरील लोककथा, दंतकथा इत्यादिसंबंधीं माहिती आली. तिच्या गुणवर्णनपर अनेक भक्तगणांनीं भक्तिगीतें तयार केलीं पण ती अखेरपर्यंत अलिखित राहिल्यामुळें व परंपरेनें पुढें चालत आलीं नसल्यानें कालोदरांत गडप झालीं. अलीकडील जीं हाताशीं आलीं त्यांत खालील एक-दोन गीतांचा येथें उल्लेख करावास वाटतो.

श्री. अं. पा. कावडकर यांनीं केलेलें "श्री अंबापद-अंबुजा भज मना तारील ती सर्वदा" हें एक; आणि दुसरें ह. भ. प. खर्शीकर महाराज यांचें "साष्टांगें करितों प्रणाम चरणा जय जय महाकालिके" अशीं दोन पदें अलीकडील आहेत. देवस्थानाचे विश्वस्त श्री. एन्. जी. महाकाळे यांच्या संग्रहांत हीं गीतें आहेत.

११४०२

## प्रेक्षणीय स्थळें :

चंद्रपूर हें शहर 'चांदा' नांवानेंच विशेष ओळखलें जात असतें. हें शहर वर्धा–बल्लारशा (मध्य रेल्वे) लोह-मार्गावर वर्ध्यापासून नववें व बल्लारशापासून दुसरें स्टेशन असून येथें सर्व गाड्या थांबत असल्यामुळें देवीच्या दर्शनास यावयाची मुळींच गैरसोय होत नाहीं. तसेंच चांदा फोर्ट-गोंदिया हा पूर्व रेल्वेचा जो छोटा (मीटर गेज) लोहमार्ग आहे तिचें हें शेवटलें स्टेशन व इथून फक्त १ मैलाचे आंत महाकालीचें देवालय आहे. चांदा जिल्ह्याच्या दक्षिणेस आंध्र राज्य आणि पश्चिमेस यवतमाळ, वर्धा हे जिल्हे असल्यानें त्या भागांतून पायीं किंवा खाचरगाडीनें अनेक यात्रिक देवीच्या दर्शनास येत असतात. चांदा रेल्वे स्टेशनापासून महाकालीचें मंदिर जवळ जवळ दोन अडीच मैलांवर आहे व मार्ग चांदा शहराच्या मध्य-वस्तींतून असून रिक्षा टांगा आदि वाहनांची सोय आहे. गडचिरोली, मूळ, ब्रह्मपुरी, सिरोंच्या, अहिरी इत्यादि भागांतून अहोरात्र मोटार वाहतूक चालू असल्यानें जिल्ह्यांतील कोण-त्याहि भागांतून येथें येण्यास अडचण वाटत नाहीं.

महाकालीच्या दर्शनास येणाऱ्या बाहेरगांवच्या यात्रि-काला येथें येतांच प्रथम गोंडकालीन ऐतिहासिक वैभवाचें प्रत्यक्ष दर्शन घडतें. परकोटाच्या प्रत्येक दरवाजावर गोंड राजाचें राजचिन्ह 'हत्तीच्या गंडस्थळावर चढलेला सिंह' असून येथील 'रामाळा तलाव' खरोखरीच प्रेक्षणीय आहे. विविधरंगी सूर्य-विकसिनी कमळांनीं आच्छादिलेला व प्रभातींच्या सूर्यकिरणांनीं कांतिमान दिसत असलेला तो तलाव आणि त्याच्या पाठीशीं

उभा असलेला परकोट अवश्य पाहून जाण्यासारखा आहे. तशींच गांवांतील मंदिरें, पठाणपुरा व अचलेश्वर दरवाजे. त्यालगतचें अचलेश्वराचें मंदिर आणि शिल्पकलेनें समृद्ध अशी



रामाळा तळें : चांदा

वीरशहाची समाधि. भिवापुरचा मारुती व पूर्व रेल्वेस्टेशन चांदा फोर्टपासून अर्ध्या मैलावर लालपेठच्या अरण्यांत असलेली दशमुखी दुर्गादेवी (किंवा रावण ?) ही स्थळें प्रेक्षणीय आहेत.

यात्रेच्या दिवसांत यात्रेकरूंची राहण्या वगैरेची सोय येथील नगरपालिकेकडून होत असते. याव्यतिरिक्त सभोंवतील पटांगणांत व जवळच्या झरपट नदीच्या विस्तृत कांठावर व सडकांच्या दुतर्फा बाजूनें जलशांचे फड, सर्कस-तमाशे व मनोरंजनादि खेळांची भाऊगर्दी होते. येथें मोठा बैलबाजारहि त्याच वेळीं भरविण्यांत येतो.

या विभागांत आलेल्या बाहेरगांवच्या हौशी व चिकित्सक प्रवाशाला कोळशाच्या खाणी, कांच कारखाना, पॉटरीज् वगैरे पहावयास मिळतात. येथून ११ मैलांवर पक्की सडक व लोहमार्ग असलेलें बल्लारपूर शहर; तेथील खांडक्या बल्लाळशाचे वेळचा भग्न स्थितींत असलेला पण वर्धा नदीतटावरील निसर्गरम्य दर्शन

घडविणारा किल्ला व तसेंच कागदाची गिरणी आणि कोळशाच्या खाणी या गोष्टी एकदां अवश्य पाहून येण्यासारख्या आहेत.

जुनी संस्कृति व पुराण इतिहास संशोधनाच्या दृष्टीनें इथून १५ मैलांवर असलेलें भद्रावती नगर व बौद्धकालीन वैभवाचें प्रतीक विद्यासन, तसेंच पार्श्वनाथाचें (जैन) मंदिर हीं स्थळें प्रेक्षणीय आहेत. लोहमार्ग व मोटार वाहतूक व्यवस्थितपणें चालू असल्यानें तेथें केव्हांहि जाण्यास अडचण नाहीं.

निसर्गसौंदर्य, वनशोभा व वन्यपशूदर्शन घडविणारें येथून अठ्ठावीस मैलांवर पक्कया सडकेवर असलेलें 'ताडोबा राष्ट्रीय उद्यान' हें स्थळ आतां मनोरंजनाचें एक महत्त्वाचें स्थान झालेलें आहे.

**दिनक्रम :**

पहांटे पांच साडेपांचाला महाकाली देवीच्या देवळांत प्रभातजागृतीची घंटा खणखणते. आणि महाकालीचें स्तोत्र-स्तवन होऊन देवळाची झाडलोट, स्वच्छता संपली कीं, षोडशोपचारें सकाळीं ७ पासून पूजेला सुरवात होते ती नऊ-दहा वाजेपावेतों आटोपते. दररोज देवीच्या दर्शनाला अनेक भाविक लोक येत असतातच व त्यांची रीघ सकाळीं सातपासून रात्रीं नऊ वाजेपर्यंत चालू असते. त्यांतून मंगळवारीं, तो देवीचा दिवस म्हणून, गर्दी चांगलीच वाढते. नित्यदिनीं देवीला साधीं वस्त्रें नेसविलेलीं असतात. मंगळवारीं व चैत्र महिन्यांत पूर्ण साज तिच्या अंगावर चढविला कीं त्यावेळीं तिच्या मुखावर कांहीं निराळेंच तेज चमकत असलेलें दिसतें. पूजेनंतर आरती व नैवेद्य अर्पण होतो. सायंकाळीं सूर्यास्तानंतर स्तवन व आरती सुरू होते ती रात्रीं नऊ वाजेपर्यंत चालते. तदनंतर शेज होऊन दरवाजा बंद होतो. सध्यांचे पुजारी श्री. नामदेवराव महाकाळे हे एक विश्वस्त असून जातीनें देवस्थानाची व्यवस्था पहात असतात.

एवढें मात्र खरें कीं, महाकाली देवीच्या देवळांत पाऊल ठेवतांच मन एका विशिष्ट भावनेनें भरून येतें. आणि देवीची मूर्ती तशी उग्र असूनहि तिच्या कृपेचा वरदहस्त सदैव असल्याचें

समाधान लाभतें. देवीसमोर गाभाऱ्यांत उंच ठिकाणीं शंकराची पिंडी आहे; व देवळाचे बाजूला मारुतिरायाचें छोटेंसें देऊळ पण आहे. गाभाऱ्यांतील घंटांचा निनाद सकाळपासून रात्रीं नऊ - दहा वाजेपर्यंत अखंड चालू असतो; आणि त्या निनादांत—

"जय जगदंबे" "जय श्रीमहाकाली"

असे विनम्र व भावपूर्ण निनाद विलीन होत असतात.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रा. क्र. 9918
ठाणे

**सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन : संच १ ला**
**संच रु. ३—६०; प्र. पुस्तक ६० नये पैसे**

१. सुंदर तें ध्यान : पंढरपूर
२. जय जय रघुवीर समर्थ : सज्जनगड
३. ज्ञानोबा माउली : आळंदी
४. एका जनार्दनी : पैठण
५. मल्हारी मार्तंड : जेजुरी
६. तुका झालासे कळस : देहू

**सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन : संच २ रा**
**संच रु. ३—७२; प्र. पुस्तक ६२ नये पैसे**

१. श्रीगोंदे, भवताप हरी : त्र्यंबकेश्वर - नाशिक
२. मंगलमूर्ति मोरया : चिंचवड
३. जय जगदंब : कोल्हापूर
४. श्रीगुरुदेव दत्त : नरसोबाची वाडी - औदुंबर
५. जय भवानी ! : तुळजापूर
६. माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिकें : नेवासें

**सांस्कृतिक महाराष्ट्र दर्शन : संच ३ रा**
**संच रु. ३—७२; प्र. पुस्तक ६२ नये पैसे**

१. गोमंतकाची शान्ति - शक्ति : कवळें
२. पार्वतीपते ! हर हर महादेव : श्रीमंगेश
३. 'डाकिन्याम् भीमशंकरम्' : भीमाशंकर
४. दलितांचा कैवारी भार्गवराम : परशुराम
५. छत्रपतींचें कुलदैवत : शिखर शिंगणापूर
६. श्रीगुरूंचें गंधर्वपूर : गाणगापूर

REFBK 0011402

REFBK-0011402



वोरा अँण्ड कंपनी पब्लि.प्रा.लि.
मुंबई.